# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी/२०१८-१९/२०१८/ 4478 दिनांक : २०/१०/२०१८

**अतितात्काळ / कालमर्यादा दिनांक २२/१०/२०१८**

प्रति
प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय – जात वैधता व नॉनक्रिमी लेयर प्रमाणपत्र विहीत मुदत सादर न केल्याने प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ – १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१७/१३४८ दिनांक २०/१०/२०१८
२. मा आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्ष कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक सीईटी कक्ष/प्रवेश प्रक्रिया/जावैप्र/२०१८-१९/१४२६ /२०१८ दिनांक १९/१०/२०१८

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता राखीव प्रवर्गातून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यान जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र प्रवेश निश्चिती वेळी सादर करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार अदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक १७ दिनांक २४/०६/२०१८ च्या अनुषंगाने राज्य सीईटी कक्ष व शासनाच्या संबंधित विभागाच्या मान्यतेने जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर सादर करण्याबाबत दिनांक /वेळापत्रक निश्चित करुन देण्यात आले होते.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील राखील प्रवर्गातील विद्यार्थ्याचे प्रवेश निश्चित करण्यात आलेले होते. तथापी विहीत केलेल्या मुदतीत जात पडताळणी व नॉन क्रिमीलीयर प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे ज्या विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध करण्याबाबत संदर्भिय पत्राव्दारे या कार्यालयास निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी खालील प्रपत्रामध्ये **(Excelsheet)** माहिती भरुन सदर **Excelsheet** या कार्यालयाचे ई मेल **info.ropune@gmail.com वर दिनांक २२/१०/२०१८** पर्यत सादर करावी. **Excelsheet** मधील माहिती **Times New Roman** मध्ये टाईप करावी.

| अ क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा कोड | अभ्यासक्रमाचे नाव | राखीव प्रवर्गातून प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | जात वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करु न शकेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | नॉन क्रिमीलयीर प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करु न शकेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | जात वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्याने प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | नॉन क्रिमीलयीर प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्याने प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

20-10-18
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत – प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.